We don't wish To be The BIGGEST
But we try to the BEST
IDEAL TRADERS
Since 1975
Jio
PRIME RETAILER
Go Green, Say no to PLASTIC!
SCHOOL BOOKS, OFFICE & COMPUTER STATIONARY
1-Kumar Corner, Opp. Post Office,
DAHANU ROAD,Dist : Palghar, Pin 401602
Email : idealdahanu@gmail.com Ph : 02528-222996, Cell : 9226770000

शासनमान्य जाहिरात यादीत समाविष्ट दैनिक वर्तमानपत्र!

# राजतंत्र


INDUSTRY 4 HER
Shahnaz Parveen Initiative women
पालघर जिल्ह्यातील प्रत्येक गावात
इलेक्ट्रॉनिक सिस्टम डिझाइन अँड मॅन्युफॅक्चरिंग (ईएसडीईएम)
महिलांसाठी ईएसडीएम उद्योग
शहनाज परवीन
संस्थापक
www.industry4her.com

| वर्ष १८ | अंक ९० | सोमवार दि. १ एप्रिल २०१९ | दैनिक | किंमत १ रुपया | पृष्ठे ६ | पालघर | संपादक : संजीव जोशी | RNI NO. MAH/MAR/2002/08765

# एसीजी असोसिएटेड कॅप्सुल्सच्या प्रकल्प विस्ताराला
# आशागड ग्रामपंचायतीचा रेड सिग्नल

राजतंत्र, संजीव जोशी
डहाणू | दि. ३१

येथील आशागड ग्रामपंचायतीच्या हद्दीतील एसीजी असोसिएटेड कॅप्सुल्स या आशिया खंडातील सर्वात मोठ्या अशा औषधांच्या रिकाम्या कॅप्सुल्स बनविण्याऱ्या उद्योगाच्या विस्तारास आशागड ग्रामपंचायतीकडून हरकत घेतली जाण्याची शक्यता आहे. विस्तारासाठी ना हरकत पत्र द्यायचे किंवा नाही यासाठी ग्रामसभेने एक समिती गठीत केली असून त्यामध्ये वकील संजय कुबल व लघु उद्योजक नरेंद्र बोभाटे यांचाही समावेश करण्यात आला आहे. ही समिती ना हरकत देताना सर्व घटकांचा बारकाईने विचार करीत असून उद्योगामुळे होणारे भूगर्भातील जलप्रदूषण हा कळीचा मुद्दा बनला आहे. परिसरातील विहिरींचे पाणी प्रदूषित झाले असून हे प्रदूषण प्रथम दूर करावे असे ग्रामपंचायतीने कळवले आहे.



- कंपनीकडून स्थानिकांना डावलले जाण्याची भावना: या कंपनीमध्ये स्थानिक तरुणांना हेतुपुरस्सर रोजगाराच्या संधी दिल्या जात नसल्याची स्थानिकांची भावना आहे. त्याच बरोबर येथील स्थानिक व आदिवासी तरुणांकडून बेकायदेशीरपणे वर्षानुवर्षे कंत्राटी पद्धतीने काम करुन घेतले जात आहे.
- त्यासाठी कंपनीने दोन प्रवेशद्वारे ठेवली असून दोन्ही प्रवेशद्वारातून प्रवेश केलेले कामगार एकाच ठिकाणी व एकाच प्रकारचे काम करीत असले तरी मुख्य प्रवेशद्वारातून प्रवेश करणाऱ्यांना गलेलठ्ठ पगार आणि दुसऱ्या प्रवेशद्वारातून तुटपुंज्या पगारावर काम करणारे कंत्राटी कामगार जातात अशी परिस्थिती आहे.

या प्रश्नांवर कंपनी व्यवस्थापनाची बाजू समजून घेण्यासाठी संपर्क साधला असता प्रतिसाद मिळाला नाही. यातून कंपनी व्यवस्थापनाकडे ठोस उत्तरे नसल्याचे दिसून येत आहे.

- कंपनीचा विस्तार होत असताना या अस्वस्तेने आता डोके वर काढले असून शोषण आणि प्रदूषणासाठी विस्ताराला का परवानगी द्यायची असा प्रश्न विचारला जात आहे.

सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा सदोष

शेती सिंचनासाठीचे हक्काचे पाणी पळविलेले

प्रदूषणाची पातळी आणखी वाढण्याची शक्यता.

- आशागड ग्रामपंचायत हद्दीतील चिंचपाडा, निंबारपाडा, डोंगरीपाडा या परिसरातील भूगर्भातील पाणी पूर्णपणे प्रदूषित झाले असून कंपनीची सांडपाण्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा सदोष आहे.
- आधीच कंपनीने रायतळी येथील बंधाऱ्यातून आदिवासींच्या शेती सिंचनासाठीचे हक्काचे पाणी पळविलेले असून तेही पाणी कमी पडते आहे.
- पाण्याचा दुसरा स्त्रोत उपलब्ध नाही. अशा परिस्थितीत विस्तार केल्यास प्रदूषणाची पातळी आणखी वाढणार आहे.



- कंपनी सांडपाण्यावर प्रक्रिया न करताच शोषखड्ड्यात सोडत असल्याने ते प्रदूषित पाणी जमिनीत मुरत असल्याची ग्रामस्थांची शंका आहे. कंपनी ग्रामस्थांना प्रत्यक्ष स्थळ पहाणी करण्याबाबत टाळाटाळ करीत असल्याने या शंकेत अधिकच भर पडत आहे.







## आधी प्रदूषण नियंत्रित करा, मग विस्तार करा!

- एकीकडे आदिवासींचे हक्काचे पाणी पळवायचे आणि दुसरीकडे त्यांचे पिण्याचे पाणीही पिण्यालायक ठेवायचे नाही अशा प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये आधीच मोठा असंतोष आहे. यावर उपाययोजना म्हणून कंपनीतर्फे चिंचपाडा व निंबारपाडा येथे एक छोट्याश्या नळाद्वारे तुटपुंजे पाणी उपलब्ध करण्यात येत असले तरी आंघोळीसाठी प्रदूषित पाणी वापरल्यामुळे त्वचारोगांचे प्रमाण वाढले आहे. डोंगरीपाड्याला मात्र प्रदूषित पाणीच प्यावे लागत आहे.

- आशागड ग्रामपंचायतीने याबाबत कंपनीला कळवले असता कंपनी कुठलेही ठोस आश्वासन देत नसून केवळ दोन ओळींचे मोघम उत्तर देऊन वेळ निभावत आहे. कंपनी व्यवस्थापनाने महाराष्ट्र राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ, डहाणू तालुका पर्यावरण संरक्षण प्राधिकरण, कामगार अधिकारी या सर्वांना आपल्या खिशात घातले असल्यामुळे बिनधास्तपणे ग्रामपंचायतीच्या ना हरकत पत्राची वाट न पहाता विस्तारित प्रकल्प उभारणीचे काम सुरु केले आहे. कंपनीच्या आवारात मोठ्या प्रमाणात विना परवानगी उत्खनन देखील सुरु केले आहे.



१. कंत्राटी कामगारांसाठी कंपनीने बनविले स्वतंत्र प्रवेशद्वार.
२. विस्तारित प्रकल्पाचे प्रगतीपथावर असलेले काम.
३. चिंचपाडा येथील विहिरीतील प्रदूषित पाणी.
४. कंपनीने टिचभर पाणी देण्याची केलेली व्यवस्था.
५. डोंगरीपाडा येथील विहिरीवर ग्रामपंचायतीने पाणी पिण्यास अयोग्य असल्याचा फलक लावला असला तरी हेच पाणी प्यावे लागते.
६. कंपनीच्या आवारात चालू असलेले विना परवानगी उत्खनन.

# तारेही चुरशीच्या रिंगणात

***अमरावती लोकसभा मतदारसंघात खासदार आनंद अडसूळ यांच्या विरोधात महाआघाडीकडून अभिनेत्री नवनीत राणा लढत देत आहेत. पक्षातल्या नेत्यांनी केलेलं बंड अडसूळ कसं शमवतात, यावर गणितं अवलंबून आहेत. शिरूर मतदारसंघात अभिनेते डॉ. अमोल कोल्हे यांनी 'हाती घड्याळ बांधल्यानं' अटीतटीची लढत बघायला मिळणार आहे.***


या लोकसभा निवडणुकांमध्येही विविध राजकीय पक्षांनी स्टार्सना उमेदवारी देऊ केली आहे. त्यांची लोकप्रियता आणि त्या त्या पक्षाचा प्रभाव यातून अंतिमत: विजयाची गणितं कशी जुळून येतात, ते पहायला हवं. अशाच दोन स्टार स्टडेड लढती चर्चेत आहेत. देखणी अभिनेत्री नवनीत राणा अमरावती मतदारसंघातून तर शिवाजी आणि संभाजीराजांच्या भूमिकेत ठसा उमटवणारे अमोल कोल्हे शिरूर लोकसभा मतदारसंघातून उभे ठाकले आहेत. दोघांच्याही मतदारसंघांमध्ये चांगलीच चुरस अनुभवायला मिळत आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघ आणि शिवाजीराव आढळराव पाटील असं जणू समीकरणच झालं होतं. आपल्याला स्पर्धकच नाही, असं धरून चाललेल्या शिवाजीरावांची 'स्वराज्यरक्षक संभाजी'च्या रुपातले अमोल कोल्हे अचानक समोर येताच धावपळ सुरू झाली. डॉ. अमोल कोल्हे यांनी हाती घड्याळ बांधल्यानं शिरूर लोकसभा मतदारसंघात अटीतटीची लढत बघायला मिळणार आहे. भाजपच्या गेल्या पाच वर्षांमधल्या शेतीविषयक धोरणामुळे शेतकरी त्रस्त आहे. या मतदारसंघात कांदा उत्पादकांची संख्या जास्त आहे. कांद्याला गेली तीन वर्षं उत्पादन खर्चापेक्षा सातत्यानं कमी भाव मिळत आहे. डॉ.कोल्हे यांनी नेमक्या याच मुद्द्यांवर प्रचारात भर दिला आहे. शिवाजीरावांनी खेडमधल्या प्रस्तावित विमानतळाला केलेला विरोध आणि त्यामुळे झालेलं शेतकऱ्यांचं नुकसान हा प्रचारातला मुद्दा ठरला आहे. दुसरीकडे कोल्हे हे मूळ नारायणगावजवळचे आहेत. उत्तम वक्तृत्व आणि प्रसिद्ध व्यक्तिमत्वाचा फायदा त्यांना होणार आहे. तरुणांमध्ये असलेल्या लोकप्रियतेचा त्यांना फायदा होऊ शकतो. कोल्हे यांचा मार्ग कठीण असला तरी अशक्य नाही. गुळगुळीत पाटी विरुद्ध कोरी पाटी अशी ही लढत आहे. तरी ती गेल्या वेळेसारखी एकतर्फी न होता चुरशीची होणार आहे. शिरुरच नाही, तर पुणे जिल्ह्यात माळी मतदार अधिक आहे. त्यांचं काही अंशी वर्चस्व आहे. ही बाब डॉ. कोल्हे यांना तिकीट देताना राष्ट्रवादीनं विचारात घेतली आहे. पाटी कोरी असल्यानं डॉ. कोल्हे यांच्यावर टीका करणं आढळरावांना अवघड जाणार आहे. आता मोदी लाटही राहिलेली नाही. फक्त तीन टर्मचं मोठं भांडवल आहे. परिणामी, आढळरावांचा जनसंपर्क मोठा आहे. पक्षापेक्षा व्यक्ती म्हणून होत असलेलं मतदान ही बाब त्यांना दर वेळी सहाय्यभूत ठरत आहे. युतीच्या पाच आमदारांची फौज त्यांच्याकडे आहे. आढळरावांचा वैयक्तिक करिष्मा विरुद्ध राष्ट्रवादीची पणाला लागलेली प्रतिष्ठा असा सामना होत आहे.



दुसरी लक्षवेधी लढत अभिनेत्री नवनीत राणा यांच्यामुळे वेधक बनली आहे. अमरावती मतदारसंघात आनंदराव अडसूळ मागच्या दोन निवडणुकंमध्ये निवडून गेले असले तरी त्यांचं आणि स्थानिक नेत्यांचं कधीच जमलं नाही. अभिनेत्री नवनीत राणा आणि अडसूळ यांच्यात थेट लढत होणार आहे. अमरावती लोकसभा मतदारसंघात सहा विधानसभा मतदारसंघ येतात. बडनेरा, अमरावती, दर्यापूर, मेळघाट, अचलपूर, तिवसा या मतदारसंघांचा समावेश आहे. हा लोकसभा मतदारसंघ अनुसूचित जातीसाठी राखीव आहे. मतदारसंघ राखीव होऊन दहा वर्षं पूर्ण झाली आहेत. २०१४ च्या लोकसभा निवडणुकांमध्ये नवनीत राणा राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढल्या होत्या. त्यांना तीन लाख २९ हजार २८० मतं मिळाली होती. एक लाख ३६ हजाराच्या फरकानं त्यांचा पराभव करत अडसूळ लोकसभेत पोहचले. त्या वेळी मोदी लाट होती. या वेळी नवनीत राणा त्यांच्या युवा स्वाभिमानी या पक्षाकडून निवडणूक लढणार आहेत. त्यामुळे पक्षाचं चिन्ह नसल्याचा फटका त्यांना बसू शकतो. निवडणुकीत पराभूत झाल्यानंतर राणा पाच वर्षं स्वस्थ बसल्या नाहीत. त्यांनी जनतेशी कायम जनसंपर्क राखला; मात्र अडसूळ असा जनसंपर्क राखण्यात कमी पडले. शेतमालाचा भाव, स्वामिनाथन आयोगाकडे झालेलं दुर्लक्ष आणि सत्ताधारी पक्षावर असलेल्या नाराजीचा फटका या वेळी अडसूळ यांना बसण्याची शक्यता आहे. वंचित विकास आघाडी, बसप आणि मुस्लिम मतदारांमधल्या मतविभागणीवर राणांचं भवितव्य अवलंबून आहे. यावेळी महाआघाडीत आरपीआय गवई गट सहभागी आहे. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत राजेंद्र गवई यांना अडीच लाखांच्या जवळपास मतं पडली होती. २०१४ मध्ये गवई यांना केवळ ५४,१७८ मतं मिळाली. त्यामुळे या निवडणुकीत गवई गट परिणामकारक ठरेल असं वाटत नसल्याचं अनेकांचं मत आहे. वंचित बहुजन आघाडीची भूमिका अद्यापही तळ्यात मळ्यात आहे. एक अभिनेत्री म्हणूनही नवनीत राणांची जिल्ह्यात क्रेज आहे. त्या जनसामान्यांमध्ये पटकन मिसळतात. नवनीत राणा यांनी अनेक तेलगू चित्रपटांमध्ये मुख्य भूमिका साकारल्या आहेत. आमदार रवी राणा यांच्यासोबत विवाहबंधनात अडकल्यानंतर त्यांची राजकीय कारकीर्द खऱ्या अर्थानं बहरु लागली. २०११ मध्ये अमरावतीतल्या सामूहिक विवाह सोहळयात ३००१ जोडप्यांसोबत त्यांनी लग्न केलं. राजकारणाचा जराही गंध नसणाऱ्या राणांनी राजकारणातले खाचखळगे अल्पावधीत आत्मसात केले. या पार्श्वभूमीवर या रणात कोण बाजी मारतं हे पहायचं.

# चुणूकदार 'चिनूक'

***आगळ्या धाटणीचं चिनूक सी एच-४७ एफ (आय) हे हेलीकॉप्टर नुकतंच भारतीय हवाई दलात दाखल झालं आहे. अमेरिकन बनावटीची चिनूक ही चार हेलिकॉप्टर भारत खरेदी करणार आहे. २०१५ च्या सप्टेंबरमध्येच अमेरिकेच्या बोइंग कंपनीशी याविषयीचा करार झाला होता. त्यानुसार भारत १५ 'सीएच-४७ एफ (आय)' ही हेलीकॉप्टर खरेदी करणार आहे. या हेलिकॉप्टरविषयी...***



पें भारतानं अमेरिकेकडून खरेदी केलेलं चिनूक हवाई दलाच्या ताफ्यात दाखल झालं आणि हवाई दलाची ताकद वाढल्याचं सूतोवाच अनेक तज्ज्ञांनी केलं. एकूण दीड अब्ज डॉलरच्या व्यवहारातली पहिली चार चिनूक हेलिकॉप्टर १२६ व्या हेलीकॉप्टर युनिटमध्ये सेवा बजावणार आहेत. उर्वरित हेलीकॉप्टर २०२० पर्यंत हवाई दलाच्या ताफ्यात दाखल होतील.
त्यांच्यापैकी काही हेलीकॉप्टर सध्या आसाममधील दिनजान तळावर कार्यरत राहणार आहेत. या हेलिकॉप्टरची पहिली तुकडी नियोजनाप्रमाणे ठरलेल्या वेळेच्या आधीच गुजरातच्या मुंद्रा बंदरात पोहचली. या संदर्भातली आणखी महत्त्वाची बाब म्हणजे हे हेलिकॉप्टर चालवण्याचं प्रशिक्षण भारतीय वैमानिकांना गेल्या वर्षीच्या ऑक्टोबरमध्ये अमेरिकेत देण्यात आलं आहे. त्यामुळे ही हेलिकॉप्टर ताफ्यात झाल्यापासूनच प्रत्यक्ष कामकाजासाठी उपयुक्त बनली आहेत.
चिनूक विमानांमुळे हवाई दलाच्या परिस्थितीत बदल होईल, असं हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल बी. एस. धनोआ यांनी म्हटलं आहे आणि त्यामुळेच चिनूकविषयीची उत्सुकता वाढली आहे. उंचावरच्या प्रदेशांमध्ये अवजड सामग्री वाहून नेण्याची असलेली मोठी क्षमता हे चिनूकचं प्रमुख वैशिष्ट्य आहे. त्यामुळे सैनिकांची ने- आण करणं याबरोबरच तोफांची, इंधनाची आणि शस्त्रसामग्रीची वाहतूकही या हेलिकॉप्टर्समधून करणं सहजशक्य होणार आहे. या हेलिकॉप्टरला दोन इंजिनं आहेत. त्याचा आणखी एक फायदा म्हणजे ती रात्रीही वापरता येतात. त्यामुळे नैसर्गिक आपत्कालीन परिस्थितीतही मदतकार्यासाठी त्यांचा वापर करणं शक्य आहे. हवाई दलांसमोर सहसा नेहमीच दुर्गम प्रदेशात लष्करी सामग्री वाहून नेण्याचं मोठं आव्हान असतं. हवाई दलाचे वैमानिक सहसा बहुतेक ठिकाणी समुद्रसपाटीपासून अतिउंच प्रदेशांमध्ये काम करतात. चिनूकच्या समावेशामुळे आता अशा दुर्गम आणि उंच प्रदेशातील त्यांचा वावर सामग्रीच्या ने-आणीमुळे सुलभ ठरणार आहे. याआधी हवाई दलाकडे असलेली हेलिकॉप्टर जवानांना घेऊन जाण्यासाठी उपयुक्त होती. परंतु या विमानांमुळे अवजड रसद नेण्याचा प्रश्न मार्गी लागणार आहे, कारण आधी त्यासाठी विमानांचा वापर करावा लागत होता. मात्र दुर्गम सीमाभागात सगळीकडेच विमानं उतरवणं शक्य नसतं आणि काही ठिकाणी ती उतरवली गेली तरी त्यात मोठीच जोखीम असते. त्या दृष्टीनंही चिनूक उपयुक्त ठरणार आहेत.
अमेरिकेच्या व्हर्टोल या अमेरिकन रोटोक्राफ्ट कंपनीनं ही हेलिकॉप्टर पहिल्यांदा तयार केली आणि त्यांचं उत्पादन बोइंग व्हर्टोलनं केलं. नंतरच्या काळात यालाच 'बोइंग रोटोक्राफ्ट सिस्टिम्स' असं म्हटलं जाऊ लागलं. अवजड साहित्याची किंवा सामग्रीची ने-आण करणाऱ्या आघाडीच्या पाश्चात्य हेलिकॉप्टरपैकी एक म्हणून या हेलिकॉप्टरकडे पाहिलं जातं. चिनूक हे नाव आधुनिक वॉशिंग्टन परगण्यातील मूळच्या चिनूक वंशाच्या लोकांवरून देण्यात आलं आहे. चिनूकचं मूळ डिझाईन व्हर्टोलनं केलं होतं. १९५७ मध्ये नवीन टँडेम-रोटर हेलिकॉप्टरवर त्यांनी काम सुरू केलं होतं. या मॉडेलला नंतर व्हर्टोल मॉडेल १०७ किंवा व्ही-१०७ असं म्हटलं गेलं. त्याच दरम्यान अमेरिकेच्या लष्कर विभागानं पिस्टन इंजिनवर चालणाऱ्या सिकोर्स्की सीएच-३७ च्या जागी नवीन गॅस टर्बाईनवर चालणारी हेलिकॉप्टर आणण्याचा निर्णय घेतला. १९५८ च्या जूनमध्ये अमेरिकन लष्करानं व्ही-१०७ ची व्हर्टोलला ऑर्डर दिली. मात्र काही चाचण्यांनंतर ही हेलिकॉप्टर लष्करी कारवायांच्या दृष्टीनं खूपच जड असल्याचा आणि वाहतुकीच्या दृष्टीनं खूपच हलकी असल्याचा अहवाल अमेरिकेच्या लष्करी अधिकाऱ्यांनी दिला.
याच दरम्यान वायएचसी-१ ए मध्ये सुधारणा करून सीएच-४६ सी नाईट हेलिकॉप्टर यूएस मरिन कॉर्प्सकडून स्वीकारलं जाणार होतं. लष्करानं मात्र वाहतुकीसाठी वापरण्यास अधिक जड असलेल्या हेलिकॉप्टरची आणि व्ही-१०७ च्या मोठ्या नमुन्याची मागणी केली. सुरुवातीला वायसीएच-१बी या नावानं आलेल्या रोटोक्राफ्टच्या पूर्व उत्पादित हेलिकॉप्टरचा वापर १९६१ पासून स्थानिक वाहतुकीसाठी करण्यात आला. १९६२ मध्ये एचसी-१बी ची पुनर्रचना करण्यात आली आणि '१९६२ युनायटेड स्टेटस ट्राय सर्व्हिस एअरक्राफ्ट डेसिग्नेशन सिस्टिम'अंतर्गत सीएच-४७ ए तयार करण्यात आलं. हेच चिनूक हेलिकॉप्टर होय. चिनूकमध्ये विविध प्रकारचा माल भरण्यासाठी आणि उतरवण्यासाठी अनेक साधनांचा आणि सुविधांचा वापर केला जातो. त्यात विमानाचा पंखा, शेपूट, यंत्र इत्यादी सोडून विमानाच्या उर्वरित सांगाड्याला असलेले अनेक दरवाजे, सांगाड्याच्या मागच्या बाजूला माल चढवण्यासाठीचा खास मार्ग, पुढच्या बाजूला अतिरिक्त माल वाहून नेण्यासाठी एकूण तीन आकडे इत्यादींचा समावेश असतो. १९६२ मध्ये चिनूकचा सर्वोच्च वेग १७० नॉट्स (ताशी ३१५ किलोमीटर) होता. त्यावेळी हा वेग अमेरिकेकडच्या समकालीन लष्करी आणि सर्वसामान्य हेलिकॉप्टर्सपेक्षा थोडा अधिक होता. अद्यापही अमेरिकेच्या हेलिकॉप्टर्समध्ये चिनूकचा सध्याचा वेग जास्त आहे.
चिनूक लष्करी सेवेत दाखल झाल्यापासून त्याचे अनेक सुधारित आणि अधिक शक्तिशाली नमुने तयार करण्यात आले. १९८२ मध्ये या नमुन्यांपैकी सीएच-४७ डी चं उत्पादन करण्यात आलं. अधिक शक्तिशाली इंजिनं, पंख्यांची संयुक्त पाती, कॉकपीटची पुनर्रचना, अद्ययावत उड्डाण नियंत्रण यंत्रणा अशा सीएच-४७ सी मध्ये सुधारणा करून हे हेलिकॉप्टर तयार करण्यात आलं होतं. १९६० च्या दशकात विकसित करण्यात आलेल्या काही महत्त्वाच्या हेलिकॉप्टरमध्ये या हेलिकॉप्टरचा समावेश होता. अमेरिकन लष्कराकडून आणि रॉयल एअर फोर्सकडून या विमानांचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला. याखेरीज याचाच नागरी नमुना असलेल्या बोइंग व्हर्टोल २३४ चा वापर विविध नागरी सेवांसाठी आणि अर्थातच प्रवाशांच्या व मालाच्या वाहतुकीसाठी करण्यात आला. बांधकाम आणि तेल उत्खननाच्या कामासाठीही या विमानांचा वापर केला गेला. अलीकडचं अद्ययावत सीएच-४७ एफ हे चिनूकच्या डी आवृत्तीची सुधारित आवृत्ती आहे.
२००१ मध्ये सीएच-४७ एफ या सीएच ४७-डी या चिनूक हेलिकॉप्टरच्या सुधारित आवृत्तीतील हेलिकॉप्टरनं पहिल्यांदा स्थानिक उड्डाण केलं. पेनसिल्व्हानियातल्या रिडले पार्क इथे बोइंग सुविधेत २००६ मध्ये या हेलिकॉप्टरचं पहिलं मॉडेल तयार झालं. ४८६८ शाफ्ट-अश्वशक्ती (३,६३० किलोवॅट) हनीवेल इंजिनं आणि सिंगल पीस बांधणी असलेली हवाई चौकट ही त्याची वैशिष्ट्यं होती. त्याच्या बांधणीद्वारे कंपनं कमी करण्यात आली आणि त्याचं सेवा आयुष्य वाढवण्यात आलं. आता सीएच-४७ एफ हे ताशी २८२ किलोमीटरहून अधिक वेगानं उडू शकतं. तसंच ९.५ टनांहून अधिक वजन वाहून नेऊ शकतं. या आवृत्तीत करण्यात आलेल्या सुधारणांमध्ये रॉकवेल कोलीन्स कॉमन ॲव्हिऑनिक्स आर्किटेक्चर सिस्टिम (सीएएसएस) असलेलं कॉकपीट आणि बीएई सिस्टिम्सची डिजीटल प्रगत उड्डाण नियंत्रण यंत्रणा यांचा समावेश आहे. देखभालीचा खर्च कमीत कमी यावा अशा सुधारणा त्यात करण्यात आल्या आहेत. शिवाय त्यामध्ये डिजीटल उड्डाण नियंत्रक आहेत. सध्या या विमानाची व्यापारी आवृत्ती जगभर बांधकामासाठी, जंगलांमधले वणवे आणि आगी यांना प्रतिबंध करण्यासाठी आणि तेल उत्खननाच्या ठिकाणी वापरली जातात. अमेरिकेबाहेरच्या कंपन्यांना चिनूकची बांधणी करण्यासाठी परवानेही दिले गेले आहेत. इटलीतल्या ऑगस्टा वेस्टलँडकडे आणि जपानमधल्या कावासाकीकडे चिनूकच्या बांधणीचे असे परवाने आहेत. आगी विझवणं, विमानांचा शोध घेणं, आपद्ग्रस्तांचा शोध आणि सुटका यासाठी ही हेलिकॉप्टर वरदान ठरत असल्याचं बहुतेक देशांचं म्हणणं आहे.

**लक्षवेधी**
**ओंकार काळे**

बोइंगनं २००८ मध्ये अमेरिकन लष्कराला सीएच -४७ एफ बनावटीची १९१ चिनूक हेलिकॉप्टर ४.८ अब्ज अमेरिकन डॉलर्सच्या कंत्राटावर दिली होती. २००७ मध्ये नेदरलँड्स हवाई दलानं १७ चिनूक हेलिकॉप्टरची खरेदी केली. नेदरलँड्स हा चिनूकचा पहिला आंतरराष्ट्रीय ग्राहक ठरला. २००९ मध्ये कॅनडानं आपल्या हवाई दलात अत्याधुनिक चिनूकचा समावेश केला. २००९ मध्ये ब्रिटननेही २४ चिनूकची ऑर्डर दिली आणि २०१२ पर्यंत ती त्यांना दिली जाणार होती. २०१० मध्ये ऑस्ट्रेलियाने आपल्याकडची आधीची सीएच-४७ डी बदलून त्या जागी एफ आवृत्तीच्या हेलिकॉप्टरची मागणी केली आणि २०१४ ते २०१७ दरम्यान ती घेतली. याखेरीज २०१५ मध्ये त्यांनी आणखी तीन विमानं घेतली. सिंगापूरनंही अशाच प्रकारे आधीची चिनूक बदलून २०१६ मध्ये ही सुधारित चिनूक घेतली. आणखीही काही देशांनी चिनूकची खरेदी केली आहे. भारतानेही आता या देशांच्या यादीत स्थान मिळवून हवाई दलाला अधिक बळकटी आणली आहे.




**राशीभविष्य**

- **मेष** : सारासारबुद्धी वापरा. तरुणांना जबाबदारीची समज द्या. विनाकारण अडचणीत गुंताल.
- **वृषभ** : कौटुंबिक गैरसमज दूर होतील. संततीच्या अपेक्षा पूर्ण कराल. अचानक अर्थप्राप्तीचे योग.
- **मिथुन** : नोकरीत सहकारी अडथळे निर्माण होतील. प्रिय व्यक्ती नाराज होईल. प्रवासात धोका.
- **कर्क** : घरात शुभकार्य होईल. ताणतणाव संपतील. करमणुकीत वेळ घालवाल.
- **सिंह** : मनावर ताबा ठेवणे कठीण होईल. कोणा एकाच्या हट्टीपणाचा त्रास होईल. आळस नुकसान करेल.
- **कन्या** : पैशाची आवक उत्तम राहील. कुटुंबाकडून उत्तम सहकार्य मिळेल. संततीबद्दल सुवार्ता कळतील.
- **तूळ** : शरीरावर अतिश्रमाचा परिणाम होईल. कोणास सल्ला देत बसू नका. खाण्यावर नियंत्रण ठेवा.
- **वृश्चिक** : मालमत्तेचा वाद मिटेल. जुनी येणी वसूल होतील. कार्यक्षेत्रात आवडीचा प्रोजेक्ट मिळेल.
- **धनु** : नातेवाईकांमुळे अडचणी निर्माण होतील. जुनी दुखणी त्रास देतील. खर्चात अनपेक्षित वाढ होईल.
- **मकर** : आर्थिक स्थिती बिकट राहील. प्रवास म्हणजे समस्या वाटेल. विवेकबुद्धी जागृत ठेवा.
- **कुंभ** : गोड बोलून कार्यभाग साधाल. सर्व बाबतीत आघाडी असेल. संकल्प सिद्धीस जातील.
- **मीन** : शासकीय कामास अनुकूल दिवस. आत्मविश्वास जागृत राहील. नवपरिणीतांचे प्रश्न सुटतील.

**मनातलं ओठांवर**

## अकाली प्रौढत्व!

अमीत, डोळ्यादेखत मोठा झालेला मुलगा. कॅन्सरमुळे आईचं अकाली निधन झालं आणि मिसुरडं फुटायच्या वयातच त्याच्या डोक्यावरचं मातेचं छत्र हरपलं. तेव्हापासून धाकट्या बहिणीची आणि वडिलांची जबाबदारी त्याच्यावर येऊन पडली. पत्नीच्या निधनानंतर खचलेल्या वडिलांना आधार देत त्याने स्वत:चं शिक्षण पूर्ण केलं. पदवीनंतर लगेचच नोकरी पत्करली आणि कमवायला लागून बहिणीच्या उच्चशिक्षणाची तजवीज करायला सुरूवात केली. तिच्या लग्नासाठीही त्याची तयारी सुरू आहे. मागच्या महिन्यातच त्याचं लग्न झालं. घरात आठ-दहा माणसांना बोलावूनच त्याचा विवाहसोहळा पार पडला. मध्यंतरी दिसला तेव्हा त्याला विचारलं, 'काय रे, इतके साधेपणाने का लग्न केलं?' तेव्हा सत्तावीस वर्षांचा अमीत म्हणाला, 'काकू, माझ्या लेखी सोहळ्याला महत्त्व नाही. आईचं स्वप्न पूर्ण करण्याला आहे. मला सोनलला डॉक्टर बनवायचंय. शक्य तितके पैसे वाचवायेत मला.' त्याचं ते अकाली प्रौढत्व अंगावर आल्यासारखं वाटलं मला!

## १ एप्रिल

**दिन विशेष**

- **२०१३** : वादग्रस्त सेतुसमुद्रम प्रकल्पासंदर्भात भूमिका मांडण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने तमिळनाडूला दोन आठवड्यांचा वेळ दिला.
- **२०१६** : अभिनेत्री प्रत्युषा बॅनर्जीची आत्महत्या.
- **२०१७** : सक्तवसुली संचालनालयाच्या पथकांनी देशभरातील २३०० बनावट कंपन्यांवर छापे टाकले.
- **२०१८** : इस्रोच्या 'जीसॅट-६ ए' या दळणवळण उपग्रहाशी नियंत्रण कक्षाचा संपर्क तुटला. संशोधकांमध्ये चिंतेचं वातावरण.

**महत्त्वपूर्ण काही...**

## ...म्हणून अभ्यास गरजेचा

पावसावर थेट परिणाम पडत असल्यामुळे एल निनो आणि ला निनाच्या स्थितीकडे संशोधक आणि अभ्यासकांचं बारकाईने लक्ष असतं. आपल्या देशाची अर्थव्यवस्था शेतीवर आणि शेती मान्सूनच्या पावसावर अवलंबून असल्यामुळे ही बाब गरजेची ठरते. मान्सूनच्या पावसावर एल निनोचा प्रभाव जाणवेल इतका पडतो. एल निनोच्या प्रतापापोटी मान्सूनच्या आणि पावसाच्या सरासरीत लक्षणीय घट होते. अलीकडच्या काळातील जवळपास प्रत्येक दुष्काळाचं उत्तरदायित्व आपण एल निनोच्या पदरात टाकू शकतो. उलटपक्षी ला निनाची सद्दी असते तेव्हा सरासरीइतका किंवा त्याहूनही अधिक पाऊस पडतो. मात्र ला निनाच्या काळात वादळांचं प्रमाणही वाढतं. उलट एल निनो वादळांना अटकाव करतो. एल निनोचा प्रभाव सात ते नऊ महिनेच टिकतो. त्यामुळे साधारणत: एकाच वर्षीच्या मान्सूनवर त्याचा अनिष्ट परिणाम होतो. लागोपाठ दोन वर्षे दुष्काळाची परिस्थिती क्वचितच उद्भवते. पण काही प्रभाव दोन वर्षेही टिकून राहिल्याचं दिसून येतं. या अनियमितेमुळे याविषयी कसलंही भाकीत करता येत नाही.

**पंचांग**

**सोमवार, १ एप्रिल २०१९**
विलंबीनाम संवत्सर, शके १९४०,
फाल्गुन कृ. १२, नक्षत्र : धनिष्ठा,
चंद्रराशी : कुंभ, साध्य योग
सूर्योदय ६.४५, सूर्यास्त : ६.५२

**फॉरवर्डस**


**जीवलगाशी अद्वैत साधलं जातं तेव्हाची अवस्था अशी असते...**

मैने खुद को
मैं कहना छोड दिया
जब से उसने कहा
तुम मेरे हो...

**आरोग्यमंत्र**

## वेळेवर निचरा आवश्यक

शरीरयंत्रणेतील गुंतागुंत आणि त्यात विस्कळीतपणा आल्यास होणारे परिणाम अभ्यासण्याजोगे असतात. आपल्या शरीरात अनेक जीवरासायनिक क्रिया सतत सुरू असतात. अशा प्रत्येक क्रियेदरम्यान काही टाकाऊ पदार्थ तयार होत असतात. ते साचून राहणं घातक ठरतं. त्यामुळे त्यांचा नियमित निचरा होण्याची गरज असते. त्याशिवाय आपण कळत-नकळत शरीरावर अत्याचारही करत असतो. अबरचबर खात असतो. त्यांच्या पचनातून शरीराला घातक अशी उच्छिष्ट उरतात. त्यांचाही निचरा होणं आवश्यक असतं. यापैकी टाकाऊ पदार्थ रक्तात उतरतात आणि ते त्यातून काढून रक्त शुद्ध करण्याची जबाबदारी मूत्रपिंडावर असते. रक्त गाळून त्यातले टाकाऊ पदार्थ विरघळवून शरीराबाहेर टाकण्याचं कामही मूत्रपिंडाद्वारे होतं. शिवाय शरीरातील पाण्याच्या प्रमाणाचा समतोल राखण्याचं कामही मूत्रपिंडांना करावं लागतं. उन्हाळ्यात भरपूर घाम येतो. त्यामुळे शरीरातल्या पाण्याचा निचरा होतो. त्यामुळे मूत्राद्वारे अतिरिक्त पाणी बाहेर टाकण्याची आवश्यकता नसते. हिवाळ्यात याविरुद्ध परिस्थिती असते. त्या काळात घाम येत नाही. सहाजिकच अतिरिक्त पाण्याचा निचरा मूत्रातून करणं आवश्यक असतं. त्या दिवसांमध्ये वरचेवर लघवी लागते याचं कारणही हेच आहे. अशाप्रकारे शरीरयंत्रणा सुरू ठेवण्यासाठी मूत्रपिंडाची महत्त्वाची भूमिका असते. त्यात बिघाड झाल्यास मोठी किंमत मोजावी लागते.



**स्मार्ट शॉपिंग**

इस्त्री हे घरातलं अत्यावश्यक उपकरण असतं. ते खरेदी करताना आधी गरजेचा विचार करावा. सतत जीन्स अथवा कॉटनचे कपडे वापरात असतील तर साध्या म्हणजेच ड्राय इस्त्रीपेक्षा वाफेची इस्त्री उपयुक्त ठरते. या इस्त्रीतून वाफ बाहेर पडत असल्यामुळे कपड्यांवर पाणी मारण्याची आवश्यकता रहात नाही, सहाजिकच हे काम अधिक सोपं होतं. मात्र सिल्कच्या कपड्यांना इस्त्री करताना ड्राय इस्त्रीचा पर्यायच योग्य ठरतो. शिवाय नाजूक कपड्यांनाही साध्या इस्त्रीने चांगली इस्त्री होते. ड्राय इस्त्रीची किंमतही कमी असते.



# मैत्री अशीच असते...

जिथे शब्दांची नव्हे तर स्पर्शाची भाषा कळते, भावनांची कंपनं एकमेकांपर्यंत सहजतेने पोहोचतात, नजरेचा नजरेशी संवाद घडतो, खूप काही सांगितलं जातं आणि खूप काही ऐकलं जातं, कोणत्याही कारणाशिवाय होणाऱ्या अशा भेटीतून नेमकं कोणतं समाधान मिळतं ते समजत नाही. पण समजत नाही आणि मोजता येत नाही म्हणूनच ते अत्यंत मौल्यवान असतं...

# कबुतराला मिळाले लाखो युरो

**या** जगात कोणाला कशाचं वेड असेल हे सांगता येत नाही. आपली आवडती गोष्ट खरेदी करण्यासाठी माणूस कितीही पैसे खर्च करू शकतो. आता बेल्जियममधल्या एका कबुतराला चीनमधल्या एका व्यक्तीने तब्बल १.२५ दशलक्ष युरो म्हणजे तब्बल ९.६ कोटी रुपये देऊन खरेदी केलं. हे कबुतर युरोपमधल्या बर्ड रेसिंग स्पर्धेचं विजेता होतं. 'आर्मांडो' असं त्याचं नाव. 'आर्मांडो'ने २०१८ मध्ये 'बर्ड रेसिंग' स्पर्धा जिंकली होती. जोएल वर्शूट यांनी हे कबुतर पाळलं होतं. 'आर्मांडो'च्या लिलावात एवढे पैसे मिळतील, याची मला अजिबात कल्पना नव्हती, असं जोएल सांगतात. त्यांनीच या कबुतरांना स्पर्धेत सहभागी होण्याचं प्रशिक्षण दिलं. आर्मांडोच्या याच कौशल्याने प्रभावित होऊन दोन चीनी नागरिकांनी त्यांच्याशी संपर्क साधला. आर्मांडोच्या लिलावाची प्रक्रिया दोन आठवडे सुरू होती. शेवटच्या तासाभरात त्याच्यावर तब्बल एक लाख युरोंची बोली लागली. दुसऱ्या वेळी त्यात दोन हजार युरोंची वाढ करण्यात आली. त्यानंतर या बोलीचा आकडा १२ लाख ५२ युरोपर्यंत जाऊन पोहोचला आणि कबुतराचा लिलाव संपन्न झाला. जोएल यांच्याकडे जवळपास ५०० पक्षी आहेत. ते या पक्ष्यांचा लिलाव करत असतात. २०१७ मध्येही शिंग वेई नावाच्या चीनी व्यावसायिकाने चार लाख युरो देऊन त्यांच्याकडचं कबुतर विकत घेतलं होतं. जोएल दिवसातले बारा तास या पक्ष्यांसोबत घालवतात. जोएल यांनी प्रशिक्षण दिलेले पक्षी कोणत्याही वातावरणात आणि परिस्थितीत उडू शकतात, असं म्हटलं जातं. 'आर्मांडो' पाच वर्षांचा असून आता बर्ड रेसिंग स्पर्धेतून निवृत्त होण्याची वेळ त्याच्यावर आली आहे. मात्र त्याचं दिशेचं ज्ञान अगदी पक्कं असल्याचं जोएल सांगतात. गेल्या काही वर्षांमध्ये चीनमध्ये बर्ड रेसिंग मोठ्या प्रमाणात वाढलं आहे. त्यामुळे इथले लोक वाट्टेल त्या किंमतीत प्रशिक्षित कबुतरं खरेदी करायला तयार होतात.





# छोटा जलतरणपटू

**बो**स्निया आणि हर्जोगोविना नावाचा एक देश आहे. अवघी ५० लाख लोकसंख्या असलेल्या या देशातला आठ वर्षांचा मुलगा इस्माईल जुल्फिक जलतरणपटू आहे. महत्त्वाचं म्हणजे त्याला दोन्ही हात नाहीत. पायांनीही तो थोडा अधू आहे. या परिस्थितीतही त्याने सात पदकं जिंकली आहेत. इस्माईल वयाच्या चौथ्या वर्षापासून पोहतो. चार वर्षांचा असताना आई त्याला पहिल्यांदा पोहायला घेऊन गेली. त्याने एक पाय पाण्यात बुडवला. गारेगार पाण्याच्या स्पर्शाने हा चिमुकला पळून गेला, असं त्याचे प्रशिक्षक आमेल कापो सांगतात. मग हळूहळू त्याचा विश्वास जिंकण्यात सर्वांना यश आलं. इस्माईलची पाण्याची भीती गेली आणि मग त्याने घेतलेल्या भरारीचं वर्णन शब्दात करता येणार नाही. फक्त तीन वर्षांमध्ये तो पट्टीचा जलतरणपटू बनला. आता तर तो मोठ्या वयाच्या जलतरणपटूंनाही टक्कर देतो. स्थानिक पातळीवर त्याने सात पदकं जिंकली आहेत. आता त्याची निवड ऑलिम्पिक पूलमध्ये सरावासाठी करण्यात आली आहे. ऑलिम्पिक पूल म्हणजे पूर्णपणे आंतरराष्ट्रीय दर्जाचा स्वीमिंग पूल. भविष्यात ऑलिम्पिक आणि त्या दर्जाच्या स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची क्षमता असलेल्या जलतरणपटूंनाच या तलावात सरावाची संधी दिली जाणार आहे. इस्माईलमध्ये अनेकांना उद्याचा ऑलिम्पिक पदकविजेता दिसत आहे. त्याने आत्तापर्यंत सुवर्ण किंवा रौप्यपदक पटकावलं असून जवळपास १० स्पर्धांमध्ये तो सहभागी झाला आहे. २०१७ मध्ये त्याला बोस्नियाच्या उदयोन्मुख खेळाडूचा पुरस्कार मिळाला होता. तो आठवड्यातून तीन दिवस पोहण्याचा सराव करतो. स्वीमिंग पूलपर्यंत पोहोचण्यासाठी त्याला ७० किलोमीटर अंतर कापावं लागतं.

# थप्पड मारा, पैसे जिंका!

**अ**लिकडे एक व्हिडिओ सोशल मीडियावर बराच व्हायरल झाला. यात एकमेकांना थप्पड मारणारे लोक पहायला मिळतात. हे कुठलं भांडण आहे का, असंच वाटून जातं. पण प्रत्यक्षात ही एक स्पर्धा आहे. रशियामध्ये या स्पर्धेचं आयोजन केलं जातं. स्लॅपिंग चँपियनशिप असं या स्पर्धेचं नाव असून यातल्या विजेत्याला ३० हजार रुबेल म्हणजे साधारण ३५० युरो बक्षिस म्हणून दिले जातात. या स्पर्धेत दोन पुरुष स्पर्धक एकमेकांना थप्पड मारतात. सर्वात जोरदार थप्पड मारणारा विजेता ठरतो. या स्पर्धेत एक टेबल असतं. त्याच्या दोन बाजूंना स्पर्धक उभे असतात. त्यांना एकमेकांना थपडा मारायच्या असतात. जोरकस थपडेमुळे एक स्पर्धक खाली बसला की दुसऱ्याला विजेता घोषित केलं जातं. स्लॅपिंग चँपियनशिप कुस्ती स्पर्धेसारखीच असते. दोन्ही स्पर्धक हात टेबलवर ठेवतात आणि एकाड एक थप्पड मारतात. सध्या हा व्हिडिओ बराच लोकप्रिय होत आहे. या जगात कोणत्या प्रकारच्या स्पर्धा आयोजित केल्या जातील याचा काहीच नेम नाही. स्पर्धेच्या निमित्ताने का होईना, थप्पड खाणाऱ्यांची कमतरता नाही असंच म्हणावं लागेल.





# धावा आणि वाईन प्या

**भा**रतासह विविध देशांमध्ये मॅरेथॉन स्पर्धांचं आयोजन केलं जातं. या स्पर्धांमध्ये स्पर्धक काही किलोमीटर अंतर धावून पार करतात. केनिया, इथिओपियासारख्या देशांमधले ॲथलिट्स या स्पर्धांमध्ये बाजी मारतात. विजेत्यांना प्रसिद्धी आणि बक्षिस म्हणून बरीच रक्कम दिली जाते. फ्रान्समध्येही अशाच एका मॅरेथॉनचं आयोजन केलं जातं. या स्पर्धेतले स्पर्धक धावतात. पण त्यांना जिंकायचे वेध लागलेले नसतात तर खादाडी करायची असते, चविष्ट भोजनावर ताव मारायचा असतो. तसंच दर्जेदार वाईनचे घोट घ्यायचे असतात. विशिष्ट अंतर धावून पूर्ण करणाऱ्या स्पर्धकांना जगातली सर्वोत्तम वाईन चाखायची संधी मिळते. ही मॅरेथॉन सप्टेंबरमध्ये होणार आहे. मात्र सहभागी होणाऱ्या स्पर्धकांचं प्रचंड प्रमाण बघता नोंदणी प्रक्रियेला मार्चपासूनच सुरूवात झाली आहे. या स्पर्धेत सहभागी होणाऱ्या स्पर्धकांना काही अटींचं पालन करावं लागतं. यात धावणाऱ्यांना ४२ किलोमीटर अंतर कापून फिट राहण्यासोबतच थोडी-फार मजामस्ती करण्याची संधीही मिळते. या स्पर्धेचा ड्रेसकोड असतो. यंदा सुपरहिरो ही थीम देण्यात आली आहे. त्यामुळे स्पर्धकांना एखाद्या सुपरहिरोसारखा पेहराव करावा लागेल. स्पर्धेच्या विजेत्याला त्याच्या वजनाइतकी वाईन दिली जाते. यासोबतच सर्वोत्तम वेशभूषा करणाऱ्यांना चविष्ट भोजन दिलं जातं. स्पर्धकांना ६.५ तासात हे अंतर कापायचं असतं. स्पर्धेत अधून मधून विश्रांतीची संधी मिळते. या दरम्यान विश्रांतीच्या ठिकाणी लवकर पोहोचणाऱ्यांना वर्षानुवर्षं मुरवलेली वाईन चाखायला मिळते. १९८५ मध्ये या मॅरेथॉनला सुरूवात झाली. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ८८ युरो म्हणजे सात हजार रुपये भरावे लागतात. विविध देशातले लोक या स्पर्धेत भाग घ्यायला येतात.

# युरोपमधलं पहिलं अंडरवॉटर रेस्टॉरंट

**खो**ल समुद्रात, बाहेरची जलसंपदा न्याहाळत जेवायला किती मस्त वाटेल ना? नॉर्वेमध्ये युरोपमधलं पहिलं पाण्याखालचं म्हणजे अंडरवॉटर रेस्टॉरंट सुरू झालं आहे. या देशातल्या बॅलीमध्ये हे रेस्टॉरंट सुरू झालं असून इथे ४० लोकांच्या राहण्याचीही व्यवस्था आहे. या ठिकाणी एका वेळी १०० लोक बसून जेवू शकतात. रेस्टॉरंट सुरू झाल्यावर पहिल्याच दिवशी तुफान प्रतिसाद मिळाला. तब्बल सात हजार लोकांनी डिनरसाठी ऑनलाईन पध्दतीने टेबल बुक केलं. अर्थात वेगवेगळ्या दिवसांसाठी टेबल बुक करण्यात आल्याने कोणालाही नकार द्यावा लागला नाही. ३४ मीटर लांब असलेल्या या रेस्टॉरंटचा पुढचा भाग जमिनीशी जोडलेला आहे तर मागचा भाग पाण्यात पाच मीटर खोल वसला आहे. रेस्टॉरंटच्या आत काचा लावण्यात आल्या आहेत. त्यामुळे ग्राहकांना बाहेरचं सौंदर्य, समुद्री जीवन न्याहाळता येतं. अचानक एखादा मासा आपल्या जवळ येऊन जातो. रेस्टॉरंटचा आतला भाग एखाद्या मत्स्यालयासारखा दिसतो. अर्थात हे जगातलं पाण्याखालचं पहिलं रेस्टॉरंट नाही. याआधी मालदीवमध्ये अंडरवॉटर हॉटेल सुरू करण्यात आलं आहे. 'मारुका' नावाच्या या हॉटेलमध्ये राहण्यासाठी चार रात्रींचं पॅकेज घ्यावं लागतं. या पॅकेजची किंमत थोडीथोडकी नाही तर १.४ कोटी रुपये आहे. म्हणजे एक रात्र थांबायचं असेल तर ३६ लाख रुपये भरावे लागतील. पण इथे येणाऱ्या पर्यटकांना पूर्ण पॅकेज घ्यावं लागतं. बराच खर्च असला तरी पाण्याखाली राहण्याचा अनुभव भन्नाट म्हटला पाहिजे.



नियमित वाचा व इतरांना वाचायला सांगा
दैनिक राजतंत्र
संपादक : संजीव जोशी
संपर्क क्र.: ९८२२२८३४४४
Rajtantra Media HELPLINE 9890359090
Email : editor.rajtantra@gmail.com mail@rajtantramedia.com
Facebook : facebook.com/daily.rajtantra
Web Address : www.rajtantra.com www.epaper.rajtantra.com
दैनिक राजतंत्रच्या विश्वसनीय बातम्या आपल्या मोबाईलमध्ये मिळविण्यासाठी Google Play Store वरुन डाऊनलोड करा आमचे Rajtantra मोबाईल ॲप!

All Types of Agricultural/Bungalow Plots Available
VISHWA ENTERPRISES
Prop.: Akhilesh Panday
9975385252/8605292932
109, 1st Floor, Mahalaxmi Plaza, Near Janta Bank Circle, Dahanu Road (W) 401602

कपड्यांचे व होजीयरीचे होलसेल व रिटेल व्यापारी
मे. शाह पारसमल घेवरचंद
प्रो. दिपक चोरडीया
शॉप नं. २१, जनार्दन आर्केड, स्टेट बँक ऑफ हैदराबादच्या बाजूला, स्टेशनरोड, डहाणूरोड (प).
(आम्ही खरे कंपाउंड येथील जुन्या पत्त्यावरून स्थलांतरीत झालेलो आहोत याची कृपया आमच्या प्रिय ग्राहकांनी नोंद घ्यावी)

अर्जदारांचे वकील ॲड. माधुरी योगेश बोरसे

जाहिर नोटीस

चौ. अर्ज क्र. 237/2019

मे. ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट साहेब प्रथम वर्ग डहाणू यांचे कोर्टात

लाखु रडका पाचलकर -----अर्जदार
विरुद्ध
जन्म, मृत्यू, उपजत व विवाह नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत डोंगारी ----सामनेवाले

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांचे नात, नाव व जन्मतारीख खालीलप्रमाणे आहे.

| नाते | नाव | जन्म तारीख |
|---|---|---|
| स्वत: | लाखु रडका पाचलकर | ०४/०३/१९६३ |

यांचे जन्म त्यांच्या राहत्या घरी मौजे डोंगारी, तालुका तलासरी, जिल्हा पालघर येथे झाला आहे. त्यांची नोंद ग्रामपंचायत येथे करणेकामी मा. कोर्टाकडून आदेश मिळवण्याकामी अर्जदाराने अर्ज केला आहे.

त्याअर्थी जर कुणाचा नोंदणीचा आदेश देण्यात येऊ नये असे म्हणणे असेल तर त्यांनी उपनिर्दिष्ट प्रकरणी मा. कोर्टात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हरकती लेखी कळविण्यात यावी. जर मुदतीत कोणतीही हरकत उपस्थित झाली नाही तर मा. कोर्ट अर्जदाराचा लागलीच पुरावा घेऊन अर्जदाराचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचे लाभात जन्माची नोंद करण्याचा आदेश पारीत करेल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

दि. २८/०३/२०१९

(शिक्का) ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट साहेब प्रथम वर्ग डहाणू
(सही/-) सहाय्यक अधिक्षक सह दिवाणी न्यायालय डहाणू

अर्जदारांचे वकील ॲड. माधुरी योगेश बोरसे

जाहिर नोटीस

चौ. अर्ज क्र. 236/2019

मे. ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट साहेब प्रथम वर्ग डहाणू यांचे कोर्टात

श्रीम. नानी केशिया दुबळा -----अर्जदार
विरुद्ध
जन्म, मृत्यू, उपजत व विवाह नोंदणी अधिकारी ग्रामपंचायत गिरगाव ----सामनेवाले

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, ज्या अर्थी उपरोक्त अर्जदार यांचे नात, नाव व जन्मतारीख खालीलप्रमाणे आहे.

| नाते | नाव | जन्म तारीख |
|---|---|---|
| मुलगी | मंजु केशिया दुबळा | ०३/०४/१९६५ |

यांचे जन्म त्यांच्या राहत्या घरी मौजे गिरगाव,दुबळापाडा, तालुका तलासरी, जिल्हा पालघर येथे झाला आहे. त्यांची नोंद ग्रामपंचायत येथे करणेकामी मा. कोर्टाकडून आदेश मिळवण्याकामी अर्जदाराने अर्ज केला आहे.

त्याअर्थी जर कुणाचा नोंदणीचा आदेश देण्यात येऊ नये असे म्हणणे असेल तर त्यांनी उपनिर्दिष्ट प्रकरणी मा. कोर्टात प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे आत आपल्या हरकती लेखी कळविण्यात यावी. जर मुदतीत कोणतीही हरकत उपस्थित झाली नाही तर मा. कोर्ट अर्जदाराचा लागलीच पुरावा घेऊन अर्जदाराचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदाराचे लाभात जन्माची नोंद करण्याचा आदेश पारीत करेल याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

दि. २८/०३/२०१९

(शिक्का) ज्युडिशिअल मॅजिस्ट्रेट साहेब प्रथम वर्ग डहाणू
(सही/-) सहाय्यक अधिक्षक सह दिवाणी न्यायालय डहाणू

# प्रवास एका उद्देशाचा

**ए**का इलेक्ट्रिक कारचालकाने लोकांच्या सहकार्याने तीन वर्षांमध्ये ९० हजार किलोमीटरचा प्रवास केला. शून्य कार्बन उत्सर्जनाचा संदेश देण्याच्या उद्देशाने विब वेकर मार्च २०१६ मध्ये घराबाहेर पडला तेव्हा त्याच्याकडे पुरेसा पैसा नव्हता. मधल्या काळात इलेक्ट्रिक कारच्या दुरुस्तीसाठी त्याने २० हजार युरो म्हणजे जवळपास १५ लाख ६२ हजार रुपये खर्च केले. विबने यापैकी काही पैसे लोकांच्या मदतीने तर काही पैसे काम करून मिळवले. या इलेक्ट्रिक कारमधून विबने नॉर्वे ते इराण आणि म्यानमार ते संयुक्त अरब अमिरात असा प्रवास केला. या प्रवासाची अखेर ऑस्ट्रेलियातल्या सिडनीमध्ये झाली. या प्रवासाचा नेमका खर्च सांगणं कठीण असल्याचं विब सांगतो. मात्र या दरम्यान जेवण आणि राहण्याची सोय फुकट झाल्याचंही तो सांगतो. या काळात विबची अनेकांनी मदत केली. मध्यपूर्व तसंच भारतातल्या काही असुरक्षित भागातही तो गेला. मात्र प्रत्येक ठिकाणच्या स्थानिकांची त्याचं स्वागत केलं आणि पूर्ण सहकार्यही केलं. शक्य तिथे त्याने स्वत: गाडी चालवली. काही ठिकाणी त्याल गाडी बोटीने पाठवावी लागली. त्याने पैसे जमवण्यासाठी कामंही केली. या दरम्यान त्याला बऱ्याच अडचणींना सामोरं जावं लागलं. भारतात गाडीच्या मागचे टायर खराब झाले तर इंडोनेशियामध्ये गाडीत पाणी शिरलं. गाडीच्या दुरुस्तीचं काम हॉलंडमधले मॅकेनिकच करू शकत होते. क्राउड फंडींगच्या माध्यमातून त्याने जवळपास पाच हजार युरो म्हणजे चार लाख रुपये जमवले. कार्बनचं उत्सर्जन कमी करण्याचा संदेश लोकांपर्यंत पोहोचल्याचं विब वेकरचं म्हणणं आहे.



# हे म्युझियम आहे खास

**तु**म्ही विविध वस्तूसंग्रहालयांना भेट दिली असेल. भल्या मोठ्या परिसरात पसरलेल्या तीन ते चार मजली इमारतीतली ही वस्तूसंग्रहालयं देश आणि विदेशात मोठ्या प्रमाणावर आहेत. अशा संग्रहालयांमध्ये पुरातन, ऐतिहासिक वस्तू जतन करून ठेवलेल्या असतात. जुनी नाणी, नोटा, राजे-महाराजांच्या तलवारी, इतर शस्त्रं, राजमहालातल्या वस्तू असं बरंच काही इथे पहायला मिळतं. मात्र इंग्लंडमधलं एक म्युझियम खूप खास आहे. याचं कारण म्हणजे ते एका टेलिफोन बूथमध्ये साकारण्यात आलं असून जगातलं सर्वात लहान म्युझियम असल्याचं बोललं जातं. टेलिफोन बूथ हा प्रकार काळाच्या ओघात लोप पावला आहे. प्रत्येकाच्या हातात मोबाईल असल्याने एक रुपया किंवा पाउंड टाकून फोन करण्याचा विचारही कोणी करत नाही. त्यामुळे टेलिफोन बूथ इतिहासजमा झाले आहेत. म्हणूनच एका संस्थेने टेलिफोन बूथचं जतन करायचं ठरवलं. पुढच्या पिढीला याचं महत्त्व कळावं यासाठी ही संस्था प्रयत्नशील आहे. त्यांनी एका टेलिफोन बूथचं रुपांतर म्युझियममध्ये करून टाकलं. 'ब्रिटन टेलिकम्युनिकेशन'ने वापरात नसलेले ४३ टेलिफोन काढून टाकण्याचा निर्णय घेतला होता. मात्र 'वॉरले कम्युनिटी असोसिएशन' नामक संस्थेने त्यांचं जतन करायचं ठरवलं. २००८ पासूनच ही संस्था विविध मार्गांने पैसे जमवून पुरातन वारशाचं जतन करण्याचं काम करते आहे. याच प्रयत्नांमधून पश्चिम यॉर्कशायरमधल्या एका टेलिफोन बुथचं रुपांतर म्युझियममध्ये करण्यात आलं. हे म्युझियम अवघ्या ३६ चौरस फूट परिसरात पसरलं आहे. एवढ्या छोट्या जागेत बऱ्याच गोष्टी ठेवण्यात आल्या आहेत. जुने फोटो, दागिने, टेलिफोन बुथचा इतिहास असं बरंच काही इथे पहायला मिळतं. 'द मेपोल इन' असं या संग्रहालयाचं नाव आहे. हे छोटेखानी संग्रहालय पाहण्यासाठी लोकांच्या रांगा लागलेल्या असतात. विशेष म्हणजे दर तीन महिन्यांनी या बूथ म्युझियममध्ये नव्या वस्तू ठेवल्या जातात.



# जिल्ह्यातील चार लाखांहून अधिक विद्यार्थ्यांच्या माध्यमातून मतदार जागृती

राजतंत्र न्यूज नेटवर्क ●

पालघर, दि. ३१ : लोकसभेच्या निवडणुकांच्या कार्यक्रमानुसार पालघर मतदारसंघात येत्या २९ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. सर्व नागरीकांनी या प्रक्रियेत सहभागी व्हावे यासाठी निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हा प्रशासन सातत्याने प्रयत्नशील आहे. याचाच एक भाग म्हणून स्विप (SVEEP-Systematic Voters Education and Electoral Participation) कार्यक्रमांतर्गत जिल्ह्यातील ३ हजार शाळांमधील चार लाखांपेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या माध्यमातून जनजागृती केली जात असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे यांनी दिली.




## जिल्हाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे यांची माहिती

आपल्या देशाच्या लोकशाही परंपरांचे जतन करण्यासाठी, मुक्त-नि:पक्षपाती व शांततापुर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखण्यासाठी तसेच प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे व धर्म, वंश, जात, समाज, भाषा आदी विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करण्यासाठी आमच्या पालकांना व वडीलधाऱ्या व्यक्तींना मतदान करण्यास सांगू, अशी प्रतिज्ञा २६ मार्च रोजी विद्यार्थ्यांनी घेतली. त्यानंतर २७ मार्च रोजी शाळांमधून चित्रकला तर २८ मार्च रोजी रांगोळी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यासाठी मतदान, शाई लावलेली डाव्या बोटाची तर्जनी आणि भारताचा नकाशा, असे विषय देण्यात आले होते. यास विद्यार्थ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिला.

जनजागृतीच्या उपक्रमाचा भाग म्हणून २९ मार्च रोजी जिल्ह्यातील सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांनी प्रभातफेरी काढली.

**● या प्रक्रियेत सहभागी विद्यार्थ्यांचा उत्साह पाहता त्यांना प्रतिसाद देत सर्व मतदारांनी लोकसभा निवडणुकीत अवश्य मतदान करावे, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. नारनवरे यांनी केले आहे.**

यामध्ये मतदान करण्याबाबत घोषवाक्ये म्हणत त्यांनी मतदारांचे लक्ष वेधून घेतले. तर ३० तारखेला आयोजित वक्तृत्व स्पर्धेतही विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. दरम्यान, येत्या मंगळवारी (२ एप्रिल) सर्व शाळांमधून पालक सभेचे आयोजन करण्यात आले असून त्याद्वारे त्यांना लोकशाही आणि निवडणूक प्रक्रियेचे महत्त्व पटवून सर्वांनी मतदान करण्याचे आवाहन केले जाणार आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात मनाई आदेश

राजतंत्र न्यूज नेटवर्क ●




पालघर दि. ३१ : पालघर लोकसभा मतदारसंघासाठी येत्या २९ एप्रिल रोजी निवडणुक होत असुन नामनिर्देशनपत्र भरणे, नामनिर्देशन पत्राची छाननी, उमेदवारी अर्ज मागे घेणे आदी प्रक्रियांदरम्यान उमेदवारांसमवेत राजकीय पक्षाचे नेते, कार्यकर्ते व इतर नागरिक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीत घुसून वाद-विवाद होण्याची तसेच मोर्चे, आंदोलनांची शक्यता लक्षात घेता जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात २ ते १५ एप्रिल दरम्यान मनाई आदेश लागू करण्यात आला आहे.

पालघर लोकसभा निवडणुकीसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा कालावधी २ एप्रिल ते ९ एप्रिल असा असुन १० एप्रिल रोजी नामनिर्देशन पत्राची छाननी व १२ एप्रिल रोजी उमेदवारांना अर्ज मागे घेता येणार आहेत. या कामकाजाकरीता उमेदवारांसोबत ४ लोकांखेरीज इतर नागरिकांना जिल्हाधिकारी कार्यालयापासून १०० मीटरच्या परिसरात फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(२)(३) अन्वये २ एप्रिल ते १५ एप्रिल या कालावधीत प्रवेश करण्यास मनाई आदेश लागू करण्यात आला असल्याची माहिती जिल्हादंडाधिकारी डॉ. प्रशांत नारनवरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे. तसेच या आदेशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयापासून १०० मीटरच्या परिसरात विविध राजकीय पक्ष व संघटना, तसेच इतर व्यक्तींकडून त्यांच्या विविध मागण्यांकरीता मोर्चे, उपोषणे, धरणे, आंदोलनं व रास्ता रोको करण्यासही मनाई करण्यात आली आहे.

हा आदेश जिल्हाधिकारी कार्यालयात विविध कामांकरीता शासकीय, निमशासकीय व खाजगी कार्यालयातून येणारे अधिकारी व त्यांचे कर्मचारी, विविध उपक्रमांकरीता आमंत्रित करण्यात येणारे शासकीय, निमशासकीय व खाजगी कार्यालयातून येणारे अधिकारी व त्यांचे कर्मचारी, शासकीय कामकाजानिमित्त येणारे नागरीक, राजकीय पक्ष व विविध संघटनांच्या व्यक्ती तसेच विविध राजकीय पक्ष व विविध संघटना तसेच इतर व्यक्तींकडून त्यांच्या विविध मागण्यांकरीता मोर्चे, उपोषणे, धरणे, आंदोलन व रास्ता रोको करणाऱ्या ज्या व्यक्ती जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्याकरीता जिल्हाधिकारी कार्यालय व पोलीस विभागाची परवानगी घेऊन पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सोबत येतील अशा ५ पेक्षा कमी संख्येने येणाऱ्या व्यक्तींना हा मनाई आदेश लागू राहणार नाही.

# तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या



प्रतिनिधी ●

वाडा, दि. ३१ : तालुक्यातील सापणे बु. येथील २३ वर्षीय तरुणाने आपल्या राहत्या घराच्या वाश्याला दोर बांधून गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. विनोद गोविंद काळे असे सदर तरुणाचे नाव असुन त्याने कोणत्या कारणाने आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलेले हे समजू शकले नाही.

विनोदच्या कुटुंबियांनी गावाबाहेर नविन घर बांधले असुन सर्व कुटुंबीय नविन घरात वास्तव्यास असतात. शुक्रवारी हळदी समारंभासाठी घराबाहेर पडलेला विनोद पुन्हा घरी परतला नसल्याने त्याचा भाऊ त्याला शोधत जुन्या घरी आला असता विनोदने गळफास घेतल्याचे आढळून आले. याबाबत वाडा पोलीसांना खबर मिळाल्यानंतर पोलीसांनी घटनास्थळी भेट देत आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे. पोलीस याप्रकरणी अधिक तपास करीत आहेत.

# वाड्यात घरफोडी; लाखोंचा ऐवज लंपास

प्रतिनिधी ●

वाडा, दि. ३१ : शहरातील खंडेश्वरी नाका येथील एका घराच्या खिडकीतुन आत प्रवेश करून अज्ञात चोरट्यांनी रोख रक्कम व चांदीचे दागिने घेऊन पोबारा केल्याची घटना घडली आहे.

शुक्रवारी रात्रीच्या सुमारास भरत आंबवणे यांच्या भागीरथी निवास बंगल्याच्या एका बेडरूमच्या खिडकीच्या लोखंडी सळ्या वाकवून चोरट्यांनी घरात प्रवेश केला व कपाटातील ८० हजार रुपये रोख व ३० हजार रुपये किंमतीचा रेणुका देवीचा २५० ग्राम वजनाचा चांदीचा मुखवटा असा एकूण १ लाख १० हजार रुपयांचा ऐवज घेऊन पसार झाले. या प्रकरणी अज्ञात चोरट्यांविरोधात वाडा पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# विनयभंगाची तक्रार घेण्यास टाळाटाळ; तीन पोलीस निलंबित

पिंपरी/वृत्तसंस्था ●

दि. २४ : अल्पवयीन मुलीच्या विनयभंगाची तक्रार घेण्यास टाळाटाळ केल्याने पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त आर.के.पद्मानाभन यांनी चिखली पोलिस ठाण्यात कार्यरत असलेल्या एका सहाय्यक पोलिस निरीक्षकासह दोन पोलिस कर्मचाऱ्यांना निलंबीत केले आहे.

सहाय्यक पोलिस निरीक्षक निलेश जगदाळे, पोलिस कर्मचारी दत्तात्रय माळवदकर आणि राजेंद्र किरवे अशी निलंबीत करण्यात आलेल्या पोलिसांची नावे आहे. त्याबाबतचे आदेश पिंपरी-चिंचवडचे पोलिस आयुक्त आर. के. पद्मनाभन यांनी शनिवारी रात्री उशिरा दिले. या कारवाईनंतर पोलिस दलात खळबळ उडाली आहे.

# कोमसाप पालघर जिल्हा कार्यकारिणीची पुनर्रचना



राजतंत्र न्युज नेटवर्क ●

वाडा, दि. ३१ : कोकण मराठी साहित्य परिषदेच्या पालघर जिल्हा कार्यकारिणीची पुनर्रचना करण्यात आली असून जिल्हा कार्यवाहपदी उमाकांत वाघ, जिल्हा कोषाध्यक्षपदी जयेश शेलार, जिल्हा प्रतिनिधीपदी अनिलराज रोकडे व जिल्हा कार्याध्यक्षपदी सुधाकर ठाकूर यांची निवड करण्यात आली.

रविवारी (दि.३१ मार्च) कोमसाप पालघर जिल्हा मंडळाच्या कार्यकारणीची बैठक जिल्हाध्यक्ष प्रवीण दवणे यांच्या अध्यक्षतेखाली पालघर येथे संपन्न झाली. बैठकीत जिल्हा मंडळाच्या पदाधिकाऱ्यांच्या नियुक्त्या सर्वानुमते करण्यात आल्या. या सभेत नालासोपारा शाखेच्या बरखास्त करण्यात आलेल्या कार्यकारणी सदस्यांच्या जागी नवीन कार्यकारणी पदाधिकारी निर्माण करण्यासाठी प्रभारी अध्यक्ष म्हणून रविंद्र माने यांची तर वाडा शाखेच्या बरखास्त केलेल्या कार्यकारणी सदस्यांच्या जागी नवीन कार्यकारणी पदाधिकारी निर्माण करण्यासाठी प्रभारी अध्यक्ष म्हणून जयेश शेलार यांची निवड करण्यात आली.

# कायदेविषयक शिबीराला नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग

प्रतिनिधी ●



वाडा, दि. ३१ : विधी सेवा समिती व वकील संघटनेच्या वतीने काल, शनिवारी तालुक्यातील खरीवली जिल्हा परिषद शाळेत विशेष कायदे विषयक व जागरूकता शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बालकांसाठी असलेली कायदेशीर सेवा व संरक्षण योजना, रॅगिंग विषयक कायदे, मुलांचे हक्क तसेच शासनाच्या बेटी बचाव-बेटी पढाव योजनेविषयी वकील ॲड. विनय भोपतराव, दिलीप पष्टे व अविनाश साळवे यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी खरीवलीचे ग्रामसेवक संजय पाटील, विधी सेवा समितीच्या सूचिता कथडे, सामाजिक कार्यकर्ते गोविंद पाटील आदींसह ग्रामस्थ व विद्यार्थी उपस्थित होते.

# पळ काढणारे चौकीदार नव्हे तर चोर!

## कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष अशोक चव्हाण यांचा घणाघात


राजतंत्र न्यूज नेटवर्क ●

मुंबई, दि. ३१ मार्च : भाजप देशपातळीवरती मै भी चौकीदार नावाने अभियान चालवत आहे. परंतु कोणत्याही आरोपाला संवेदनशिलतेने उत्तर देण्याचे आत्मबळ भाजपमध्ये राहिलेले नाही. भ्रष्टाचार आणि नैतिकतेबाबत उपस्थित केलेल्या प्रश्नांना उत्तर न देता भारतीय जनता पक्ष पळ काढत आहे. पळ काढणारे चौकीदार नव्हे तर चोर असतात, अशी घणाघाती टीका कॉँग्रेस प्रदेशाध्यक्ष अध्यक्ष खा. अशोक चव्हाण यांनी केली आहे.

चव्हाण म्हणाले की, सत्तेत आल्यापासून भारतीय जनता पक्ष जनता, विरोधी पक्ष, माध्यमे आणि न्यायालयाने विचारलेल्या प्रश्नांपासून पळ काढत आहे. राज्याच्या मंत्रीमंडळातील दिलीप कांबळे या मंत्र्यांवर लाच घेतल्याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशाने गुन्हा दाखल आहे. लाचखोरीबद्दल त्यांची हकालपट्टी करण्याचे सोडाच परंतु त्याची दखल घेण्याची नैतिकताही भाजपमध्ये राहिलेली नाही. डॉ. नरेंद्र दाभोलकर व कॉ. गोविंद पानसरे यांच्या हत्यांच्या चौकशीतील दिरंगाई व अकार्यक्षमतेबद्दल उच्च न्यायालयाने मुख्यमंत्र्यांच्या



प्रामाणिकतेवर प्रश्नचिन्ह उभे केल्यानंतर याची नैतिक जबाबदारी घेऊन राजीनामा देणे तर सोडाच परंतु त्याला उत्तर देण्याचीही हिंमत सरकारमध्ये नाही. माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर न दिल्याने थोड्या दिवसांनी प्रश्न विचारणे बंद होईल आणि जनतेची स्मरणशक्ती कमजोर असते असे गृहीत धरून जनता हे विसरून जाईल. त्यानंतर पारदर्शकता व नैतिकतेचा टेंभा मिरवायला आपण मोकळे अशी कुटील निती भाजप पक्ष गेली काही वर्ष वापरत आला आहे. परंतु त्यांचा हा कोडगेपणा व राजकीय उन्माद कॉँग्रेस पक्ष जनतेच्या न्यायालयात घेऊन जातच राहील, असे सांगून काही शरम असेल तर तात्काळ दिलीप कांबळेंची हकालपट्टी करावी आणि मुख्यमंत्र्यांनी राजीनामा द्यावा या मागणीचा पुनरूच्चार चव्हाण यांनी केला.







हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक संजीव शशिकांत जोशी यांनी न्यू मिलेनियम प्रिंटर्स, मथुरादास मिल कंपाऊंड, मॅक्स डॉट कॉम टेलि कम्युनिकेशनजवळ, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई ४०००१३ येथे छापून १९७ ए, पहिला मजला, ई टाईप बिल्डिंग, ओस्तवाल एम्पायर, तारापूर रोड, बोईसर (पश्चिम), तालुका पालघर, जिल्हा पालघर ४०१५०१ येथे प्रसिद्ध केले. **संपादक संजीव शशिकांत जोशी.** RNI NO. MAH/MAR/2002/08765

**वाचकांसाठी निवेदन :-** या वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या जाहिरातीतील मजकूर जाहिरातदाराने दिल्याबरहुकुम प्रसिद्ध केला जातो. या मजकुराच्या सत्यतेबाबत किंवा जाहिरातीत केलेल्या दाव्याबाबत आम्ही कुठल्याही स्वरुपाची खातरजमा केलेली नसते व तशी कोणत्याही प्रकारची हमी आम्ही घेत नाही. जाहिरातीस प्रतिसाद देताना वाचकांनी स्वतः सत्यता पडताळावी व जाहिरात संदर्भात कोणतेही आर्थिक व्यवहार करताना ते पूर्णतः स्वत:च्या वैयक्तिक जोखमीवर करावेत. कोणत्याही जाहिरातदाराने केलेला कोणताही दावा फोल ठरल्यामुळे उद्भवणाऱ्या परिस्थितीसाठी दैनिक राजतंत्रचे मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक जबाबदार असणार नाहीत याची वाचकांनी कृपया नोंद घ्यावी. – **संपादक**